
# छकुल्या मुकलेल्या...



०-६ वर्षे वयाचे
बालिका - बालक प्रमाण
(१९९१-२००१) महाराष्ट्र

सध्याच्या आधुनिक जगात, समान हक्कांच्या युगात, मुलाचा हव्यास इतका पराकोटीला जातो की मुलीचा जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला जातो.

**या वेड्या हव्यासाच्या विपरित परिणतीचे हे चित्रांकन !**



- भारतात गर्भलिंग निदान केल्यामुळे **दर वर्षी अंदाजे एक लाखाहून अधिक गर्भपात होत आहेत.**

**अरनॉल्ड, किशोर आणि रॉय (२००२)**

- ''रूढी (मुलांचा हव्यास) व आधुनिक तंत्रज्ञान (सोनोग्राफी) यांमधील घातक हातमिळवणीने (Unholy alliance) भारतीय समाजात गहजब माजवला आहे.

**डॉ. आशिष बोस**

- ० ते ६ वर्षे वयोगटातील बालक बालिकांचे बिघडलेले संतुलन नीट करणे कठीण आहे. आणि त्याचे दुष्परिणाम आपल्याला खूप काळापर्यंत भोवणार आहेत.

**जे. के. बांठीया**

भारताचे **महानिबंधक व**

**जनगणना आयुक्त २००१**

- भारतात दरवर्षी सुमारे ५ लाख मुली जन्माला येण्यापूर्वीच जीवनाला मुकतात.

**प्रभात झा, राजेशकुमार इ.**

**द लॅन्सेट, ९ जानेवारी २००६**

# छकुल्या

# .... मुकलेल्या

०-६ वर्षे वयाच्या
बालिका-बालकांचे प्रमाण
(१९९१-२००१)

## महाराष्ट्र राज्यातील तालुकानिहाय स्थित्यंतर



राज्य
कुटुंब
कल्याण
कार्यालय,
पुणे

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण
## (१९९१-२००१)

$$\text{०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण} = \frac{\text{०-६ वर्षे वयातील बालिकांची संख्या}}{\text{०-६ वर्षे वयातील बालकांची संख्या}} \times \text{१०००}$$



# प्रा स्ता वि क


''स्त्रियांना जगवण्याची खरंच गरज आहे का, याबद्दल समाजामध्ये अजून साशंकता आहे.'' इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ गायनॉकॉलॉजी अँड ऑब्स्ट्रेट्रिक्स या संस्थेचे माजी अध्यक्ष एम. फाथाला यांचे हे उद्‌गार आहेत. यापुढे जाऊन भारतातील काही राज्यांच्याबाबतीत असे म्हणावेसे वाटेल की 'स्त्रियांनी जन्माला येण्याचीच काही गरज आहे का' याबद्दल तिथे संभ्रम आहे, कारण या राज्यांमध्ये गेल्या काही वर्षात ६ वर्षाखालील मुलींचे दर हजार मुलांमागे जे प्रमाण आहे, त्यात झपाट्याने घट झाली आहे.

या पुस्तिकेमध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयासाठी, सहा वर्षाखालील बालिकांचे दर हजार बालकांशी असलेले प्रमाण तालुकानिहाय चित्रित केले आहे. हे चित्रण १९९१ व २००१ या दोन जनगणनांमधील आकडेवारीवर आधारित आहे. मुंबई वगळता राज्यात एकूण ३५३ तालुके आहेत. १९९१ मध्ये यापैकी ३५१ तालुक्यांमध्ये हे प्रमाण ९०० हून जास्त होते. त्यामुळे महाराष्ट्राचा नकाशा 'हिरवा' दिसत होता. २००१ मध्ये मात्र हे चित्र पालटून यातील एक चतुर्थांश तालुके ८५१ ते ९०० प्रमाण असलेल्या गटात गेले आहेत. त्यामुळे या तालुक्यांचा 'हिरवा' रंग उडून 'पिवळा' झाला आहे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. मुख्यत: आदिवासी तालुक्यात हे प्रमाण वरच्या पातळीत राहीले आहे आणि तथाकथित विकसित भागात ते कमी आहे. आकडेवारीतील स्थित्यंतर चित्ररूपाने अधिक उठावदार झाले आहे.


या घटणाऱ्या स्त्री–पुरूष प्रमाणाबद्दल राज्यांची आणि जिल्हयांची चर्चा आत्तापर्यंत अनेक ठिकाणी झाली आहे. मात्र तालुका पातळीवरील तुलना या पुस्तिकेव्दारे पहिल्यांदाच होत आहे. अशा वेगवेगळया स्तरावर या विषयाबाबत जाणीव वाढवणे आवश्यक आहे. पीएनडीटी ॲक्टच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाचे जे प्रयत्न चालू आहेत, त्यांना या जाणीव जागृतीमुळे चांगला हातभार लागणार आहे. या महत्त्वाच्या विषयावर ही आकर्षक पुस्तिका तयार केल्याबद्दल डॉ. प्रकाश डोके, संचालक आरोग्य सेवा यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करते.

**ॲना दाणी**
प्रधान सचिव व आयुक्त
(कुटुंब कल्याण)

## लोकसंख्येतील स्त्री - पुरूष प्रमाण
## भारत व महाराष्ट्र १९०१ - २००१ (जनगणना)




## ०-६ वर्षे वयाचे बालिका - बालक प्रमाण
## भारत १९६१-२००१ व महाराष्ट्र १९७१-२००१ (जनगणना)



# संचालकांचे मनोगत

स्त्री - पुरुषांच्या समानतेचा पुरस्कार हल्ली सगळ्या (सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इ.) क्षेत्रात होताना दिसतो पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती मात्र फारच वेगळी दिसते. ''लोकसंख्येतील स्त्री-पुरूष प्रमाण''या वस्तुस्थितीचे एक निर्देशक आहे. महाराष्ट्रामध्ये १९९१ साली हे प्रमाण दर हजार पुरूषांमागे ९३४ स्त्रिया असे होते, ते २००१ मध्ये ९२२ पर्यंत १२ अंकांनी कमी झाले आहे. यामुळे हा असमतोल वाढला आहे. जनगणनेने ''६ वर्षाखालील बालिका बालक प्रमाण'' प्रकाशित करून याची आणखी एक गंभीर बाजू प्रकाशात आणली आहे. महाराष्ट्रातील ६ वर्षाखालील बालिकांचे दर हजार बालकांशी प्रमाण, १९९१ मधील ९४६ पासून २००१ मध्ये ९१३ पर्यंत म्हणजे ३३ अंकांनी घसरले आहे. ताळतंत्र सोडून होणारी स्त्री गर्भाची हत्या हे या मागचे मुख्य कारण असावे असे स्पष्ट होत आहे. नव्या पिढीला जन्म देताना जाणून बुजून स्त्री गर्भावर करण्यात येणारा हा अन्याय, लोकसंख्येतील स्त्री - पुरूष समतोल धोक्यात आणीत आहे.

या पार्श्वभूमीवर ही आकडेवारी जनमानसावर बिंबवणे आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी संबंधितांना उद्युक्त करणे हे अतिशय महत्त्वाचे काम आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा प्रशासन आणि राजकीय नेतृत्व यांची भूमिका महत्वपूर्ण ठरते. या दिशेने राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाचा हा एक प्रयत्न आहे. यात प्रत्येक जिल्ह्यातील बालिका - बालकांचे प्रमाण तालुकावार नकाशामध्ये चित्रित करण्यात आले आहे. १९९१ आणि २००१ या दोन जनगणनांच्या आकडेवारीच्या या तुलनेमुळे, कमी होणारे बालिका - बालक गुणोत्तर अतिशय प्रभावीपणे प्रकट होते.

या तुलनेमुळे काही निरीक्षणे पुढे आली आहेत, ज्यांचा शोध घेणेही उद्बोधक ठरावे. उदाहरणार्थ, सगळीकडे हे प्रमाण कमी होत असताना, फक्त अकोला जिल्हा आणि ३८ तालुके असे आढळतील की जिथे हे प्रमाण वाढले आहे. हया प्रमाण वाढीच्या कारणांचा अभ्यास करणे हा कुतुहलाचा विषय होवू शकतो. तसेच त्यामुळे सध्याच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाययोजना सुध्दा उपलब्ध होऊ शकते. या आकर्षक पुस्तिकेमुळे बालिका - बालकांच्या प्रमाणातील वाढता असमतोल अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल आणि याची जास्त झळ पोहोचलेले तालुके लोकांच्या लक्षात येतील. यामुळे स्त्री गर्भ हत्येच्या या दुर्दैवी प्रथेला आळा बसण्यासाठी निश्चित हातभार लागेल अशी आशा आहे.

हया पुस्तिकेसाठी राज्याच्या २००१ च्या जनगणनेच्या अंतीम आकडेवारीचा व १९९१ च्या सामाजिक व सांस्कृतिक तक्त्यांमधील आकडेवारीचा उपयोग केलेला आहे. त्यामुळे या पुस्तिकेमधील बालिका - बालक गुणोत्तर, आधी प्रकाशित आकडेवारीपेक्षा काही ठिकाणी थोडे वेगळे आहे. २००१ सालापर्यंत झालेल्या नवीन ४ जिल्हे व ५३ तालुक्यांचा समावेश नकाशामध्ये केलेला आहे. २००१ सालच्या सीमा ग्राहय धरून, त्यानुसार १९९१ साठी तालुक्यांची आकडेवारी काढली आहे.

महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, बाल भारती पुणे यांनी अद्ययावत तालुक्यांच्या सीमा असलेले नकाशे पुरविल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. ही पुस्तिका या स्वरूपात प्रकाशित करण्यास राज्य लोकसंख्या शास्त्रज्ञ डॉ. (श्रीमती) मा. अ. तळवलकर आणि त्यांचे सहकारी यांनी मनापासून केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

प्रजनन आणि बाल आरोग्य कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील एक तत्त्व असे आहे की ''बालिकांना आरोग्याचा समान हक्क आहे. त्यांनाही अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा मिळाली पाहिजे आणि माणूस म्हणून योग्य प्रतिष्ठेने जगता आले पाहिजे.'' ही पुस्तिका म्हणजे या तत्त्वाला कार्यान्वित करण्याच्या मार्गावरील एक प्रयत्न आहे.


डॉ. प्र. प्र. डोके
संचालक, आरोग्य सेवा.
मुंबई.

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण



## १९९१

## भारत



**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

देशाचे प्रमाण ९४५

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## २००१

## भारत



**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

मॅपिंग द अॅडव्हर्स चाइल्ड सेक्स रेशो इन इंडिया (जून २००३)

**देशाचे प्रमाण ९२७**






## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

## महाराष्ट्र जिल्हे




- राज्याच्या मधल्या भागातील १५ जिल्हयांमध्ये हे प्रमाण इतर भागाच्या मानाने कमी आहे. (९५० पेक्षा कमी)
- राज्याच्या पश्चिमेकडील कोकण किनारपट्टी, नाशिक व नंदुरबार जिल्हयात स्त्री - पुरुष प्रमाण चांगले आहे.
- राज्याच्या पूर्वेकडील जिल्हयांमध्येसुध्दा स्त्री - पुरुष प्रमाण ९५० हून जास्त आहे.
- गडचिरोली या आदिवासी जिल्हयाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. (९८०)

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**राज्याचे प्रमाण ९४६**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# २००१

## महाराष्ट्र जिल्हे




- फक्त पाच जिल्हयांचे स्त्री-पुरुष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- जळगाव पासून कोल्हापूर पर्यंतच्या मधल्या पट्टयातील ९ जिल्हयांमध्ये हे प्रमाण वेगाने कमी झाले असून ९०० पेक्षा कमी झाले आहे. कोल्हापूर या प्रगत जिल्हयात हे प्रमाण सर्वात कमी ८३९ आहे तर इतरत्र ते ८५० ते ९०० च्या दरम्यान आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**राज्याचे प्रमाण ९१३**




# ०–६ वर्षे वयाच्या बालिका – बालकांचे प्रमाण

## १९९१

## महाराष्ट्र तालुके






**बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# ०–६ वर्षे वयाच्या बालिका – बालकांचे प्रमाण

## २००१

## महाराष्ट्र तालुके





**बालकांमधील स्त्री–पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



# १९९१

## मुंबई उपनगरे व मुंबई जिल्ह




**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## २००१

## मुंबई उपनगरे व मुंबई जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

## रायगड जि






**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- रायगडमधील एकूण १५ तालुक्यांपैकी एकही तालुका ९३५ च्या खाली नाही.
- वस्तुत: फक्त ३ तालुके वगळता इतर १२ तालुक्यातील स्त्री - पुरूष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९६१**

## २००१

## रायगड जिल्हा




- या वर्षी ह्या तालुक्यामध्ये १९९१ च्या उलट स्थिती असून फक्त ४ तालुक्यातील स्त्री-पुरूष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- पुणे-मुंबई महामार्गाजवळील व अलिबाग जवळील तालुक्यात हे प्रमाण कमी झालेले दिसते.

**जिल्हयाचे प्रमाण ९३९**

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## रत्नागिरी जिल्ह

## १९९१






- सर्वच ९ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे व ७ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९६१**

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## २००१

## रत्नागिरी जिल्हा






- लांजा, गुहागर व संगमेश्वर तालुक्यातील प्रमाण वाढून ते ९५० पेक्षा जास्त झाले असले तरी ९ पैकी ४ तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक


**जिल्हयाचे प्रमाण ९५२**



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## १९९१

## ठाणे जिल्ह




- सर्वच १५ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- शहरी भाग जास्त असलेल्या ६ तालुक्यातील स्त्री-पुरुष प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९५२**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# २००१

# ठाणे जिल्हा




- दहा वर्षात या ६ तालुक्यात एकाची भर पडून ७ तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे. ठाणे व जवळील परिसरातच हा बदल झाला आहे.
- आदिवासी तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- उल्हासनगरचे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९३१**

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक





# १९९१

## अहमदनगर जि




- सर्वच १४ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ज़िल्ह्याच्या उत्तर व दक्षिणेतील मिळून ७ तालुक्यातील स्त्री-पुरुष प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.


**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९४९**

# २००१

# अहमदनगर जिल्हा






- दहा वर्षात स्त्रीपुरूष प्रमाणात झपाट्याने घट झालेली दिसून येते व फक्त एका आदिवासी तालुक्यातील स्त्री–पुरूष प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहिलेले दिसून येते.
- उर्वरित १३ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले असून ८६० पर्यंत घसरले आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ८८४**

**बालकांमधील स्त्री–पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## १९९१

## धुळे जिल्हा




- चारही तालुक्यात हे प्रमाण ९००च्या वर असून साक्री व शिरपूर तालुक्यात ते ९५० पेक्षा जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९४७**

# २००१

# धुळे जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- चारही तालुक्यात प्रमाण घटले आहे.
- धुळे तालुक्यात ते ९०० पेक्षाही कमी झाले आहे तर इतर तीन तालुक्यात ते ९५० पेक्षा कमी झाले आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९०७**





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका – बालकांचे प्रमाण

# १९९१

## जळगाव जिल्ह

राज्यात सर्वात कमी प्र
तालुका पारोळा – ८




- १५ पैकी १४ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पारोळा तालुक्यातील प्रमाण हे राज्यातील सर्वात कमी प्रमाण आहे.

**बालकांमधील स्त्री–पुरूष प्रमा**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९२५**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# २००१ जळगाव जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक


- सर्वच १५ तालुक्यात स्त्री-पुरुष प्रमाणात लक्षणीय घट झाली असून पूर्वीच्या पारोळा तालुक्याच्या जोडीला इतर ११ तालुक्याचे प्रमाणही ८६५ ते ९०० दरम्यान झाले आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ८८०**



# नाशिक जिल

## १९९१




- सर्वच १५ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९५० पेक्षा जास्त प्रमाण असणारे १० तालुके आहेत तर ५ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमा**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९५४**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## २००१

# नाशिक जिल्हा






- ९५० पेक्षा कमी प्रमाण असणाऱ्या तालुक्यांच्या संख्येत ५ वरून १० पर्यंत वाढ झाली आहे.
- नाशिक व निफाड तालुक्यात हे प्रमाण ८८८ झाले आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९२०**



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

# नंदूरबार जिल्ह




- सर्वच ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे. हे सर्व आदिवासी तालुके आहेत.
- अक्कलकुवा व आक्रणी या २ तालुक्यात ते १००० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९७७**

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# २००१

# नंदूरबार जिल्हा




- शहादा व नंदूरबार या २ तालुक्यातील प्रमाण कमी होऊन ते ९५० पेक्षा कमी झाले आहे.
- इतर चार तालुक्यात मात्र ते ९५० पेक्षा जास्त राहिले आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९६१**



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण



# १९९१

# पुणे जिल्हा




- सर्वच १४ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पश्चिमेकडील ४ तालुके व पुरंदर मध्ये ते ९५० हून जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमा**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९४३**

# ०–६ वर्षे वयाच्या बालिका – बांलकांचे प्रमाण

## २००१

## पुणे जिल्हा






- याच्या पूर्व भागातील ६ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा (अपवाद पुणे शहर–९०९) कमी झाले आहे.
- पश्चिम भागातील ७ तालुक्यात ते ९०० ते ९५० दरम्यान आहे. स्पष्टपणे जिल्ह्याचे दोन भाग पडल्यासारखे दिसत आहेत.

**जिल्हयाचे प्रमाण ९०२**

**बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# १९९१

## सोलापूर जिल्ह




- सर्वच ११ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- दक्षिण सोलापूर तालुक्यात स्त्री–पुरुष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमा**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९३५**

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## २००१

## सोलापूर जिल्हा




- फक्त तीनच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९०० पेक्षा कमी प्रमाण असलेल्या उर्वरित ८ पैकी बार्शी तालुक्यात हे प्रमाण ८४५ पर्यंत घसरले आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ८९५**

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक




# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## १९९१

## सातारा जिल्हा






- सातारा जिल्ह्यातील ११ तालुक्यापैकी, ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे. तर महाबळेश्वर मध्ये हे प्रमाण ८८० आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमा**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९४१**

# २००१

# सातारा जिल्हा

**राज्यात सर्वात जास्त वाढ झालेला तालुका**
**महाबळेश्वर – ५१ अंक**






- महाबळेश्वर तालुक्यातील प्रमाणात ९३१ पर्यंत वाढ झाली असली तरी ११ पैकी ६ तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० मध्ये आले आहे.
- विकसित कराड तालुक्यात हे प्रमाण चिंताजनक पातळीपर्यंत (८४८ पर्यंत) घसरले आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ८७८**

**बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

## ०–६ वर्षे वयाच्या बालिका – बालकांचे प्रमाण

# १९९१

# कोल्हापूर जिल




बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमा

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पैकी ५ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९३१**




# २००१

# कोल्हापूर जिल्हा

राज्यात सर्वात कमी प्रमाण
तालुका पन्हाळा - ७९५

**राज्यात सर्वात जास्त घट झालेला
तालुका पन्हाळा-१३६ अंक**






- पश्चिम महाराष्ट्रातील प्रगत अशा कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील प्रमाणात चिंताजनक घट झाली आहे.
- राज्यात १९९१ च्या तुलनेत १०० अंकांहून जास्त घट असलेले ९ तालुके आहेत. त्यातील सर्वात जास्त म्हणजे ४ तालुके (पन्हाळा, कागल, राधानगरी व करवीर) या जिल्ह्यातील आहेत.

**जिल्हयाचे प्रमाण ८३९**

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

## ०-६ वर्षे वयाच्या बालिकां - बालकांचे प्रमाण

# १९९१

# सांगली जिल्हा






**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९ तालुक्यांपैकी आटपाडी या एकाच तालुक्यातील स्त्री-पुरूष प्रमाण ९५० पेक्षा जास्त तर इतर ८ तालुक्यात ते ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९२४**

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## २००१

## सांगली जिल्हा






- ९ पैकी ८ तालुक्यात हे प्रमाण ८०० ते ९०० या दरम्यान आले आहे.
- वाळवा तालुक्यात हे प्रमाण ८०६ पर्यंत घसरले आहे.
- साखर उत्पादक विभागात हे प्रमाण भयावह रीतीने कमी झाले आहे.


**जिल्हयाचे प्रमाण ८५१**

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# १९९१

## सिंधुदुर्ग जिल्ह




- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- वैभववाडी तालुक्यात हे प्रमाण १०३० इतके आहे.
- मध्य भागातील ५ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त असून दक्षिणेकडील २ तालुक्यात ते ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९६३**

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रम**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## २००१

## सिंधुदुर्ग जिल्हा

**हेच खरे वैभव !**

राज्यात सर्वात जास्त प्रमाण
तालुका **वैभववाडी**- १०१५






- वेंगुर्ला तालुक्यातील प्रमाण ९३४ वरून ९८४ पर्यंत वाढले आहे.
- इतरपैकी पाच तालुक्यात ते ९०० ते ९५० च्या दरम्यान असून उत्तरभागातील २ च तालुक्यात ते ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९४४**

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# १९९१

## औरंगाबाद जि




**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रम**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- औरंगाबादच्या मधल्या पटट्यातील ५ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५०च्या दरम्यान आहे. तर औरंगाबाद तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९३३**

# २००१

# औरंगाबाद जिल्हा






- पैठण व सिल्लोड तालुके वगळता इतर तालुक्यात हे प्रमाण कमी होऊन ८५० ते ९०० या टप्प्यात गेले आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ८९०**

# १९९१

## जालना जिल्हा




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ८ पैकी ४ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त प्रमाण आहे व ४ तालुक्यात ९०० ते ९५० या दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९५१**


बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमा

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## २००१

## जालना जिल्हा




- जिल्हयाच्या पश्चिमेकडील ४ तालुक्यात हे प्रमाण कमी होऊन ८५० - ९०० या दरम्यान आहे. तर पूर्वेकडील चार जिल्हयात ९०० पेक्षा जास्त आहे. पण ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९०३**

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

# परभणी जिल्ह




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९ तालुक्यापैकी ५ तालुक्यात ९०० ते ९५० दरम्यान प्रमाण आहे. इतरत्र ते ९५० पेक्षा जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधि

**जिल्हयाचे प्रमाण ९५६**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# २००१

# परभणी जिल्हा




- सोनपेठ वगळता इतर सर्व तालुक्यात या प्रमाणात घट होऊन सर्वांचे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान झाले आहे.
- सोनपेठ तालुक्यात या प्रमाणात वाढ झालेली आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९२३**


**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



# १९९१

# हिंगोली जिल





- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९५० ते १००० या दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९५३**

# २००१

# हिंगोली जिल्हा




- कळमनूरी तालुका वगळता इतर (३) तालुक्यात हे प्रमाण कमी झाले असून ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे तर सेनगाव मध्ये हे ९०० पेक्षा कमी झाले आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९२७**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

# बीड जिल्हा






- सर्वच ११ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्हयाच्या ७ तालुक्यांमध्ये हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान असून उर्वरित ४ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्र**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९३९**

## ०–६ वर्षे वयाच्या बालिका – बालकांचे प्रमाण

# २००१

# बीड जिल्हा




- दक्षिणेकडील ६ तालुक्यात स्त्री–पुरूष प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे. इतर तालुक्यात ते ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ८९४**

**बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक





# १९९१

## नांदेड जिल्हा




- सर्वच १६ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- भोकर, माहूर व बिलोली या तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी असून इतर सर्व तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधि

**जिल्हयाचे प्रमाण ९६०**

# ०–६ वर्षे वयाच्या बालिका – बालकांचे प्रमाण

## २००१

## नांदेड जिल्हा




- हे चित्र एकदम उलट झाले असून फक्त किनवट व धर्माबाद तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे व इतर १४ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे.

**बालकांमधील स्त्री–पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९२९**



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## १९९१

## लातूर जिल्हा




बालकांमधील स्त्री-पुरुष प्र

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक


- सर्वच १० तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या पूर्वेकडील ४ तालुक्यात व रेणापूर तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त असून इतर ५ तालुक्यात ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९४७**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# २००१

# लातूर जिल्हा






- मुख्यालयाच्या लातूर तालुक्यात हे प्रमाण कमी झाले असून ९०० पेक्षा कमी आहे.
- इतर सर्व तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९१८**

# १९९१

## उस्मानाबाद जि






- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्हयाच्या भूम, लोहारा, उस्मानाबाद व उमरगा तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे. इतर तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९४७**

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्र**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

## २००१

# उस्मानाबाद जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- उत्तरेकडील ५ तालुक्यांमध्ये या प्रमाणात बरीच घट झाली असून प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे. तर उमरगा, लोहारा व तुळजापूर तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ८९४**





## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

## अकोला जिल




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्र**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९२९**

# २००१

# अकोला जिल्हा

**एकमेव जिल्हा**
बालिका - बालक प्रमाणात
१९९१ च्या तुलनेत वाढ




- पातूर तालुक्यात हे प्रमाण ९२७ वरून ९५७ पर्यंत वाढले आहे.
- इतर तालुक्यात दोन्ही जनगणनेमध्ये विशेष फरक पडलेला नाही.

**जिल्हयाचे प्रमाण ९३३**

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

# अमरावती जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे
- जिल्ह्याच्या पूर्व भागातील तिवसा तालुका व पश्चिमेकडील सात तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९५०**

# २००१

# अमरावती जिल्हा

**दोन्ही जनगणनेत प्रमाण स्थिर असलेला तालुका चिखलदरा - ९६८**






- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे
- ९५० पेक्षा जास्त प्रमाण असणारे तीनच तालुके असून उर्वरित ११ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण ९४१**


### बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



# १९९१

# बुलढाणा जिल्हा




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या उत्तर बाजूकडील २ व मध्य भागातील २ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.


**बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९४५**

## २००१

# बुलढाणा जिल्हा




- जिल्हयाच्या उत्तरेकडील एकाच तालुक्यात हे प्रमाण ९५० असून दक्षिणेकडील ३ तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० दरम्यान घसरले आहे. इतरत्र हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९०८**

### बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

# यवतमाळ जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या पूर्वेकडील व पश्चिमेकडील जिल्ह्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- मध्यभागातील तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९६१**

# २००१

# यवतमाळ जिल्हा

**दोन्ही जनगणनेत प्रमाण स्थिर असलेला**
**तालुका राळेगाव - ९४४**






- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- महागांव व घाटंजी तालुक्यात ह्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९३३**

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

# १९९१

# वाशिम जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- मंगरुळपीर या एकाच तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९४१**

# २००१

# वाशिम जिल्हा






- कारंजा या वंजारी वस्ती असलेल्या एकाच तालुक्यात हे प्रमाण ९२६ वरून ९५२ वर गेले आहे.
- उर्वरित ५ तालुक्यात घट झाली असून २ तालुक्यात तर ते ९०० पेक्षा कमी झाले आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९१८**

# १९९१

# भंडारा जिल्हा




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- तालुका लाखनी वगळता इतर ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९६४**

# २००१

# भंडारा जिल्हा






**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- सर्व तालुक्यात स्त्री-पुरूष प्रमाणात थोडी घट झाली असली तरी जिल्ह्याचे चित्र बरेचसे पूर्वीप्रमाणेच असून ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- लाखनी तालुक्यात स्त्री-पुरूष प्रमाणात २८ ने वाढ झाली असून साकोली मध्ये ३२ ने घट झाली आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९५६**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# १९९१

# चंद्रपूर जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- नागभीड, चंद्रपूर व वरोरा हे तालुके वगळता इतर अकरा तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९६५**

# २००१

# चंद्रपूर जिल्हा




- उत्तरेकडील ३ तालुके, कोरपना, बल्लारपूर, पोंभूर्णा व चंद्रपूर तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.
- मुख्यालयाच्या तालुक्यात हया प्रमाणात ९४८ वरुन ८९९ पर्यंत तीव्र घट झाली आहे.
- नागभीड व सिंदेवाही या तालुक्यात ह्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९३९**

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण



## १९९१

## गडचिरोली जिल्हा

**राज्यात सर्वात जास्त प्रमाण तालुका कोरची १०८१**




**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- हा पूर्ण आदिवासी जिल्हा आहे.
- १० तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे. कोरची व अहेरी तालुक्यात हे प्रमाण अनक्रमे १०८१ व १००१ आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९८०**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# २००१

## गडचिरोली जिल्हा

दोन्ही जनगणनेत
प्रमाण स्थिर असलेला
तालुका देसाईगंज - ९४३




- कोरची तालुक्यातील प्रमाणात १२८ अंकांनी घट झाली आहे.
- देसाईगंज वगळता सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहिले आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९६६**

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक




# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## १९९१

## नागपूर जिल्हा






**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक


- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे . एकूण १४ पैकी ९ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९५१**

# ०–६ वर्षे वयाच्या बालिका – बालकांचे प्रमाण

## २००१

## नागपूर जिल्हा




- १९९१ पेक्षा उलट प्रकारचे चित्र दिसत असून ५ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहिले आहे तर ९ तालुक्यात हे प्रमाण ९३० ते ९५० दरम्यान आहे.
- नागपूर या एकाच जिल्हयामध्ये नरखेड, काटोल, रामटेक, कुही, नागपूर ग्रामीण व भिवापूर या ६ तालुक्यांत प्रमाणात वाढ झालेली आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९४२**

**बालकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



# १९९१

# वर्धा जिल्हा






- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ५ तालुक्यांमध्ये ९५० पेक्षा जास्त आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९५२**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# २००१ वर्धा जिल्हा






- सर्व तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९४९ या दरम्यान आहे.
- समुद्रपूर तालुक्याच्या प्रमाणात ५५ ने घट झाली असून ९६४ वरून ते २००१ मध्ये ९०९ झाले आहे.

**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

**जिल्हयाचे प्रमाण ९२८**



# १९९१

# गोंदिया जिल्हा




**बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण**

- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक

- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे. गोरेगाव व देवरी तालुक्यात हे प्रमाण १००० हून जास्त आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९७८**

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

# २००१

# गोंदिया जिल्हा

गडचिरोली, नंदुरबार, यवतमाळ, गोंदिया व ठाणे या आदिवासी जिल्हयांमधील प्रत्येकी दोन तालुके १९९१ मध्ये बालिका बालक प्रमाण १००० पेक्षा जास्त असलेले होते परंतु २००१ मध्ये यापैंकी एकाही तालुक्यात हे प्रमाण १००० वर राहिलेले नाही.




- अर्जुनी मोरगाव वगळता इतर तालुक्यात स्त्री-पुरूष प्रमाणात थोडी घट झाली असली तरी हे प्रमाण ६ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.
- गोरेगाव व तिरोडा या बिगर आदिवासी तालुक्यात ह्या प्रमाणात तीव्र घट झाली असून हे प्रमाण अनुक्रमे १००९ व ९७४ वरून ९४३ व ९२७ पर्यंत खाली आली आहे.

**जिल्हयाचे प्रमाण ९५८**

**बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण**


- ८०० पेक्षा कमी
- ८०० ते ८४९
- ८५० ते ८९९
- ९०० ते ९४९
- ९५० व त्यापेक्षा अधिक



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका - बालकांचे प्रमाण

## १९९१ व २००१ मधील फरक

## महाराष्ट्र






बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण
१९९१ व २००१ मधील फरक

- १०० व त्यापेक्षा अधिक घट
- ७५ ते ९९ घट
- ५० ते ७४ घट
- ३१ ते ४९ घट
- ३० पेक्षा कमी घट
- प्रमाण स्थिर किंवा वाढ

# ० – ६ वर्षे वयाच्या बालिका – बालकांच्या प्रमाणातील (१९९१–२००१) फरकानुसार तालुक्यांचे विभाजन




# महाराष्ट्राचे २००१ च्या जनगणनेतील (०-६) वर्षे वयाच्या बालिका बालकांचे प्रमाण ९१३ आहे

| | राज्य | २००१ च्या जनगणनेनुसार (०-६ वर्षे) बालिका बालक प्रमाण |
|---|---|---|
| महाराष्ट्रापेक्षा जास्त प्रमाण असणारी राज्ये | आंध्रप्रदेश | ९६१ |
| | कर्नाटक | ९४६ |
| | तामीळनाडू | ९४२ |
| | केरळ | ९६० |
| | **महाराष्ट्र** | **९१३** |
| महाराष्ट्रापेक्षा कमी प्रमाण असणारी राज्ये | गुजरात | ८८३ |
| | हरियाणा | ८१९ |
| | राजस्थान | ९०९ |
| | पंजाब | ७९८ |
| भारत | | ९२७ |




# जन्मांचे लिंग–गुणोत्तर
## (Sex Ratio at Birth)




# जन्मांचे लिंग गुणोत्तर-निवडक राज्यांची त्रिवर्षीय सरासरी

| | राज्य | १९९८-२००० | १९९९-२००१ | २०००-२००२ |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्रापेक्षा जास्त गुणोत्तर असणारी राज्ये | आंध्रप्रदेश | ९६० | ९३४ | ९४५ |
| | कर्नाटक | ९४२ | ९३५ | ९५२ |
| | तामीळनाडू | ९३१ | ९२६ | ९२६ |
| | केरळ | ९३० | ९२७ | ९११ |
| | **महाराष्ट्र** | **९१३** | **९१५** | **८९९** |
| | **भारत** | ८९८ | ८९४ | ८९२ |
| महाराष्ट्रापेक्षा कमी गुणोत्तर असणारी राज्ये | गुजरात | ८५१ | ८३७ | ८४४ |
| | हरियाणा | ७९७ | ८०३ | ८०४ |
| | राजस्थान | ८७७ | ८८५ | ८९० |
| | पंजाब | ७९२ | ७७५ | ७७५ |





आधार - नमुना नोंदणी पध्दती

## जन्मांचे लिंग-गुणोत्तर
## महाराष्ट्र १९९१-२००१ (नागरी नोंदणी योजना)




- त्रिवर्षीय सरासरीचा कल उतरता आहे.
- नोंदणी कार्यक्षमता वाढत असल्यामुळे विश्वासार्हता वाढते आहे.

## जन्मांचे लिंग गुणोत्तर
## महानगरपालिका २००० ते २००३ (नागरी नोंदणी योजना)




- जन्मांचे बिघडलेले लिंग गुणोत्तर वर्ष २००१ नंतर सुधारते आहे.

# इकडे आड
# तिकडे विहीर

पुणे परिसरातील ग्रामीण भागातील जेमतेम सातवी ते आठवी पर्यंत शिकलेली लता.

दररोज कष्ट करून उपजीविका.

एकापाठोपाठ चार मुली.

चौथ्या वेळी मुलगा हवा म्हणून टेस्ट केली परंतु मुलगी असल्याचे समजले.

आईच्या अंतर्मनाने गर्भपातास नकार दिला. गर्भपात ही बाब पटली नाही. अखेर मुलीला जन्म दिला. सासुबाई रागावलेल्या !

लताचा मानसिक दबाव वाढलेला. सासूच्या आग्रहास्तव शेवटी पाचव्या वेळी लता गरोदर राहिली.

सासूने यावेळी सज्जड दम भरलाय ''यावेळी मुलगा झाला नाहीतर तुझ्या मुली आणि तुला घराबाहेर काढीन.''

**अशा वेळी लताने काय करावे ?**

**अंजली राडकर**
गर्भपातावरील अभ्यास पाहणी (२००२)



# मुलीचा जीव आणि मुलाचा जीव वेगळा असतो काय ?

खानापूर (ग्रामीण) भागातील शोभा आणि वसंत (अनुक्रमे वय ३१ व ३६) हे २३ सदस्यांच्या संयुक्त कुटुंबातील एक जोडपे, वसंत ७ वी पास व शोभा निरक्षर, दोघेही शेतीधंद्यात, जीवननिर्वाह भाजीपाला व तांदूळ विकून मिळेल त्यावरच अवलंबून. कुटुंबात वर्तमानपत्र घेतले किंवा वाचले जात नाही. पण स्वत:चा आकाशवाणी व दूरदर्शन संच. दूरदर्शन कार्यक्रम रोज पाहायचे.

शोभाला एका पाठोपाठ ६ मुली झाल्या. पण मुलगा नाही. १८ व्या वर्षी शोभाला पहिली मुलगी झाली. अजूनही मुलांना जन्म देण्याचे काम सुरूच आहे. दोघांनाही कुटुंब नियोजनाच्या कायमस्वरूपी व तात्पुरत्या पध्दतींची माहिती आहे. परंतु वापरत नाहीत. यामागचे एकच कारण म्हणजे मुलगा हवाच !

शेवटच्या गरोदरपणाच्या वेळी कुटुंबाच्या इतर सदस्यांच्या दबावाला बळी पडून शोभाला गर्भलिंग परीक्षणास तयार होणे भाग पडले. परंतु परीक्षणापूर्वी तिने नवऱ्याला सांगितले.

''......तुमच्या आग्रहामुळे मी परीक्षण करून घेते परंतू मी माझ्या बाळाचा गर्भपात करणार नाही, जरी तो मुलीचा गर्भ असला तरी. *मुलीचा जीव अन् मुलाचा जीव वेगळा असतो काय ?''*

मुलगा होईपर्यंत ती मुलांना जन्म देण्यास तयार आहे. परंतु मुलगा हवा म्हणून ती मुलींना गर्भपाताने मारायला तयार नाही.

स्वत:च्या व घरातील इतरांच्या सुख शांतीसाठी, कुटुंबातील सदस्यांच्या दबावामुळे ती गर्भलिंग परीक्षणासाठी तयार आहे. परंतु काहीही झाले तरी ती गर्भपातास तयार नाही.

वसंतच्या मते कुटुंबाचा आकार ४ असावा. त्यात दोन मुले असावीत. शोभाच्या मते कुटुंबात जास्तीत जास्त ३ बालके असावीत, त्यापैंकी एक मुलगा असावा. शोभावर असे बिंबवण्यात आले होते की, पहिले अपत्य हे मुलगाच हवा ! पहिल्या वेळी तिच्यावर तितकेसे दडपण नव्हते. परंतु नंतरच्या प्रत्येक वेळी तिला दडपणास बळी पडावे लागते. तिला लोकांच्या कानपिचक्या ऐकाव्या लागतात. वसंताला पुरुष असल्याने असे काही ऐकावे लागले नाही.

घर, शेतीकडे लक्ष देण्यासाठी व बहिर्णींना भाऊ हवाय म्हणून, इतक्या प्रचंड मानसिक दबावाखाली असतानाही, मुलगा हवाय म्हणून ६ मुली असतानाही मोठया प्रमाणावर प्रयत्न करण्यात येत होते.

यावेळी वाढत्या कुटुंबामुळे वाढणाऱ्या खर्चाचा विचार केला जात नव्हता. ग्रामीण भागात, मुलांना जन्म देण्यासाठी कुठलाही खर्च होत नाही, असाच समज होता.

'मुलगा' कुटुंबातील विशेष घटक असल्याने मुलाच्या जास्त खर्चाबाबत विचार कोणीही करत नाही. वसंताची आई घरातील कुटुंब प्रमुख असून ती सुनेकडे जास्त लक्ष देत नव्हती. फक्त तिच्याकडून मुलाची अपेक्षा करत होती.

मुलाखतीच्या वेळी शोभाअत्यंत थकलेली जाणवत होती. ती शांत व दबावाखाली वाटत होती. ती या विषयाबद्दल बोलण्यास लाजत होती. ती अत्यंत लहान आवाजात बोलत होती. तिच्या शब्दापेक्षा तिला होणारा त्रास तिच्या डोळयामधून सर्व काही सांगत होता.

**अंजली राडकर,** पीएचडी प्रबंध १९९९

# ऋणनिर्देश

डॉ. संजीवनी मुळये

डॉ. नागराजन्

डॉ. अंजली राडकर

मेधा काळे

श्री. पी. के. कुंभार

मॅपिंग द ॲडव्हर्स चाइल्ड सेक्स
रेशो इन इंडिया (जून २००३)
–भारत सरकार (आरोग्य व कु. क. मंत्रालय),
जनगणना कार्यालय आणि यूएनएफपीए

## गर्भजल तपासणी विषयक महत्त्वाच्या घटना

१९७८ – शासकीय रूग्णालयांत गर्भजल तपासणीच्या दुरूपयोगावर बंदी आणण्याबाबत केंद्र शासनाने सूचना दिल्या.

१९८८ – सामाजिक न्यायासाठी झगडणाऱ्या संघटनांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात गर्भलिंग निदानावर प्रतिबंध आणण्यासाठी महाराष्ट्र प्रसूतिपूर्व गर्भलिंग निदान तंत्र नियंत्रण कायदा अस्तित्वात आला.

१९९४ – देशातील सर्व स्तरावर अंतिमत: देशात प्रसवपूर्व निदान तंत्र नियंत्रण कायदा अस्तित्वात आला.

२००३ – १९९४ च्या कायद्यात दुरूस्ती करून गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा अस्तित्वात आला.

२००५ – राज्यात गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्वतंत्र – लिंग निवडीस प्रतिबंध कायदा २००३ उल्लंघन केल्यामुळे एकूण ४६ जणाविरूध्द गुन्हा दाखल केलेला आहे.



## अभिप्राय

भारतीय समाजातील स्त्रीच्या ढासळत्या स्थानावर प्रकाश टाकणारी आकडेवारी २००१ च्या जणगणनेने प्रदर्शित केली आहे. ०-६ वर्षे वयाच्या मुलांमधील लिंग-गुणोत्तर (दर हजारी मुलग्यांमागे असलेल्या मुलींचा आकडा) हा निर्देशांक या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. जन्माच्या वेळचे लिंग-गुणोत्तर आणि ६ वर्षांपर्यंतच्या मुलांच्या व मुलींच्या मृत्यू-दरातील फरक या दोन गोष्टींचा उपरोक्त निर्देशांकावर परिणाम दिसून येतो. जन्माच्या वेळचे लिंग-गुणोत्तर फक्त नैसर्गिक घटकांनी प्रभावित असले आणि ०-६ वर्षे वयापर्यंत मुला-मुलींच्या मृत्यू-दरात फरक नसला तर उपरोक्त लिंग-गुणोत्तर ९४०-९५० या दरम्यान असायला हवे. २००१ च्या जनगणनेनुसार भारतासाठी हे गुणोत्तर ९२७ इतके आहे. देशातील काही राज्यांत हे गुणोत्तर बरेच कमी आहे. उदा. पंजाबात ते ७९३ आहे. दुर्दैवाने महाराष्ट्रातही हे गुणोत्तर ९१७ इतके कमी आहे. आणि १९९१ नंतर ते २९ अंकांनी कमी झाले आहे. सारांश, ही नक्कीच चिंतेची बाब आहे.

कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून महाराष्ट्र सरकारला या बाबतीत ठोस पावले उचलायला हवी आहेत. पी.एन.डी.टी. कायद्याच्या कडक अंमलबजावणी द्वारा जन्माच्या वेळचे लिंग-गुणोत्तर प्रभावित करण्याचे प्रयत्न चालू आहेतच. पण या प्रयत्नांना एक निश्चित दिशा मिळण्यासाठी महाराष्ट्रात कोणत्या प्रांतात उपरोक्त समस्या गंभीर आहे हे निश्चित करणे महत्वाचे असते. सुदैवाने २००१ च्या जनगणनेतून लिंग-गुणोत्तराची आकडेवारी तालुक्याच्या स्तरावरही मिळते. राज्य कुटुंब कल्याण संचालनालयाने ही आकडेवारी आकर्षक नकाशांच्या स्वरूपात प्रसिद्ध करून एक बहुमोल माहिती लोकांच्या हाती ठेवली आहे. त्यांचा हा उपक्रम नक्कीच प्रशसंनीय आहे. सरकारी कृती योजनांसाठी तर ही माहिती उपयोगी पडेलच पण या क्षेत्रात संशोधन करणारांनाही तिचा उपयोग होईल.

सरकारी सूत्रांकडून अशा तऱ्हेचे उपक्रम भविष्यातही होतील ही अपेक्षा.

**डॉ. संजीवनी मुळये**
गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणे - ४११००४.

आकडेवारी जनगणना २००१ च्या तात्पुरत्या अहवालावर (Provisional Report) आधारित आहे.

## महाराष्ट्रातील अट्रासाऊंड सोनोग्राफी सेंटर्स अभ्यास पाहणी २००४ मधील काही निष्कर्ष

- सोनोग्राफी केंद्राची संख्या जास्त असलेल्या जिल्ह्यांत ०-६ वर्षे वयोगटातील बालिका बालक प्रमाणातील घट जास्त.
- आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सुधारलेल्या भागात बालिका व बालक प्रमाणातील घट जास्त
- राज्यातील ७८% सोनाग्राफी सेंटर्स ही मुंबई, पुणे, नाशिक व कोल्हापूर या पश्चिम महाराष्ट्रातील चार सुधारलेल्या विभागामधील १६ जिल्ह्यामध्ये पसरलेली आहेत. तसेच जवळजवळ ५०% सेंटर्स ही महानगरपालिकांमध्ये आहेत.
- सोनोग्राफी सेंटर्सची संख्या आणि बालिका बालक प्रमाणातील घट यामध्ये 'स्टॅटिस्टिकली सिग्निफिकंट कोरिलेशन' आहे.

**डॉ. संजीवनी मुळ्ये आणि डॉ. नागराजन,**
गोखले इन्टिट्यूट, पुणे

## कायद्याने लिंग निवडीस बंदी

राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाचा (२०००) मुख्य उद्देश लोकसंख्या नियंत्रण आहे. यामागे सर्वांगीण विकास करुन स्त्री-पुरुष प्रमाण समतोल करणे हा देखील एक उद्देश आहे.

त्याच अनुषंगाने प्रसवपूर्व निदान तंत्र (विनियमन आणि दुरुपयोग प्रतिबंध) कायद्यात २००२ मध्ये दुरुस्ती होवून हा कायदा १४ फेब्रुवारी २००३ पासून अस्तित्वात आला. प्रसवपूर्ण निदान तंत्र (विनियमन आणि दुरुपयोग प्रतिबंध) १९९४ च्या कायद्याचे नावात बदल होवून गर्भधारणापूर्ण व प्रसवपूर्ण निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा असे नाव देण्यात आले आहे.

या कायद्यानुसार गर्भधारणेपूर्वी किंवा गर्भधारणेनंतर लिंग निवडीस प्रतिबंध आहे. जनुकीय विकृती व गर्भातील इतर गुणसूत्र संबंधित दोष यांचे निदान करण्यासाठी अल्ट्रासाऊंड व तत्सम तंत्राचा वापर करण्यास या कायद्यात परवानगी असली तरी या कायद्यान्वये गर्भलिंगनिदान तंत्रावर नियंत्रण आहे.

गर्भलिंगनिदान तंत्राचा दुरुपयोग होवून, गर्भलिंगनिदान करुन मुलीचा गर्भ असल्यास तो नाहीसा केला जातो. या प्रकाराला आळा बसावा व त्याद्वारे समाजातील स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोल दूर व्हावा हा या कायद्याचा उद्देश आहे.

लिंग निवड करणाऱ्यास रुपये १०,०००/- दंड व ३ वर्षे कारावासाच्या शिक्षेची तरतूद या कायद्यात आहे. पुनरावृत्ती झाल्यास रुपये ५०,००/- पर्यंत दंड व ५ वर्षे कारावास अशी शिक्षा होवू शकते. लिंगनिदानात वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग आढळल्यास राज्य वैद्यकीय कौन्सिल संबंधित डॉक्टरची नोंदणी स्थगित करु शकते आणि डॉक्टरास शिक्षा झाल्यास डॉक्टराची नोंदणी कौन्सिल रद्द करु शकते.

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
सन - २००८